# दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक

## (मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)


✻ प्रशासकीय कार्यालय ✻

अे-१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक,

नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक ४२२००७.

फोन : ०२५३-२३०८२०० ते २३०८२०६, फॅक्स: ०२५३-२३५३५८१

ई-मेल: ceo@namcobank.in वेबसाईट www.namcobank.in


# बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४ चे इतिवृत्त

# इतिवृत्त

(फक्त सभासदांसाठी)

# दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., नाशिक

## बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

### शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४ चे इतिवृत्त

बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे प्रशासकीय कार्यालय, ए–१६, औद्योगिक वसाहत, पद्मश्री बाबुभाई राठी चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, सातपूर, नाशिक–४२२००७ येथे शनिवार, दि.१४/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजतां बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सोहनलाल मोहनलाल भंडारी यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली. सभेस एकूण २४४ सभासद हजर होते खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | नांव | अ.क्र. | नांव |
|---|---|---|---|
| १ | आबाजी देवराम नवले | १७ | सोहनलाल मोहनलाल भंडारी |
| २ | प्रशांत जव्हारलाल पंचरिया | १८ | हरीष बाबुलाल लोढा |
| ३ | वासुदेव पुंडलिक बधान | १९ | सुभाष चंपालाल नहार |
| ४ | कविता वासुदेव बधान | २० | यशवंत रामचंद्र पलोडकर |
| ५ | मानस वासुदेव बधान | २१ | विलास सुपडु शिर्के |
| ६ | गौतम शामलाल सुराणा | २२ | मेघा विलास शिर्के |
| ७ | सुनिल सुभानराव गोविंद | २३ | हिम्मतराव पंडित सोनवणे |
| ८ | आशा पन्नालाल मोरे | २४ | नारायण किसन गायकवाड |
| ९ | सुनिल भिका पदमणे | २५ | भिमराव शंकर चव्हाण |
| १० | सुरेखा शांताराम शेवाळे | २६ | इरफान रज्ज़ाक मन्सुरी |
| ११ | ललित चांदमल सुराणा | २७ | प्रफुल्ल बुधमल संचेती |
| १२ | लता रामचंद्र राऊत | २८ | अशोक श्रावण सोनजे |
| १३ | सुभाष धनराज भुतडा | २९ | प्रेमचंद कचरदास राका |
| १४ | पंडीतराव रंगनाथ कातड पाटील | ३० | पोपट हरी गुंजाळ |
| १५ | अंजली रमेश पिंगळे | ३१ | भास्कर दामू सोनवणे |
| १६ | शिवाजी दामोधर कातड | ३२ | प्रकाश मोतीलाल दायमा |

| अ.क्र. | नांव | अ.क्र. | नांव |
|---|---|---|---|
| ३३ | चित्रा राजेंद्र राऊत | ६१ | भास्कर मुरलीधर माळोदे |
| ३४ | पोपट पुंजाराम कोल्हे | ६२ | अशोक हरीभाऊ सोनवणे |
| ३५ | अंकिता राजेंद्र राऊत | ६३ | फौजीया फजलु रहेमान शेख |
| ३६ | अरविंद शंकर चौधरी | ६४ | अण्णासाहेब एकनाथ डोमाडे |
| ३७ | अशोक उखा हिरे | ६५ | विजय लक्ष्मण काकड |
| ३८ | धनंजय वामनराव अबोले | ६६ | प्रशांत अशोक सोनजे |
| ३९ | रोशन प्रकाश आढाव | ६७ | कैलास बाबुराव नाईक |
| ४० | मिलिंद नरेंद्र शिरसाठ | ६८ | केशवराव शंकरराव शिंदे |
| ४१ | योगेश सोमनाथ दशपुते | ६९ | सोमनाथ रघुनाथ वराडे |
| ४२ | वेदप्रकाश बनारसीदास अग्रवाल | ७० | बंडु नाना गांगुर्डे |
| ४३ | मौसमी राणू जाधव | ७१ | ताराबाई बंडु गांगुर्डे |
| ४४ | राहुल चंद्रकांत गुंजाळ | ७२ | दिनेश वसंत वाणी |
| ४५ | सागर महिपत देसाई | ७३ | गौराम शंकर कालोटे |
| ४६ | भिमराव कोंडाजी जाधव | ७४ | नामदेव कारभारी शिंदे |
| ४७ | भिकचंद केवलचंद धाडीवाल | ७५ | रेखा नामदेव शिंदे |
| ४८ | विनोद भिकचंद धाडीवाल | ७६ | बाळासाहेब महादू सानप |
| ४९ | दिगंबर रामा जंजीरे | ७७ | विनायक पांडुरंग वाघमारे |
| ५० | हेमंत शांताराम चव्हाण | ७८ | गणेश प्रभाकर जोशी |
| ५१ | धोंडीराम पांडुरंग बोडके | ७९ | सुनिल आबाजीराव पवार |
| ५२ | ताईबाई काकासाहेब मिस्तरी | ८० | विजय प्रल्हाद अवसरकर |
| ५३ | गणेश लखीचंद लोढा | ८१ | रविंद्र रघुनाथ पगार |
| ५४ | सुधीर श्रीकृष्ण रत्नपारखी | ८२ | दामोदर उखाजी कापडणीस |
| ५५ | रामचंद्र तोताराम फुलदेवरे | ८३ | वत्सला दामोदर कापडणीस |
| ५६ | विकास रामदास रोकडे | ८४ | अशोक परशराम भदाणे |
| ५७ | देविदास काशिनाथ शिरूडे | ८५ | संगिता अशोक भदाणे |
| ५८ | जयप्रकाश रामकिसन जातेगांवकर | ८६ | अथर्व धनंजय काळे |
| ५९ | श्यामदास नरहर दशपुत्रे | ८७ | सतिष दत्तात्रय सुर्वे |
| ६० | राजेश रामदयाल धुत | ८८ | भारत बाबुराव नाईक |

| अ.क्र. | नांव | अ.क्र. | नांव |
|---|---|---|---|
| ८९ | मंगेश रामदास खर्डे | ११७ | महेंद्र चंद्रभान शिरसाट |
| ९० | राघवेंद्र राजेंद्र कोळपकर | ११८ | वैशाली दत्तात्रय शिरसाट |
| ९१ | ज्योती शांताराम सोनार | ११९ | संजय जी चोरडिया |
| ९२ | रविंद्र शांताराम सोनार | १२० | हितेंद्र (आकाश) जयप्रकाश छाजेड |
| ९३ | नंदकिशोर काशिनाथ राजे | १२१ | उल्हास रामकृष्ण सातभाई |
| ९४ | सुभाष जगन्नाथ कोठावदे | १२२ | नरेंद्र हिरामण पवार |
| ९५ | विजय पंढरीनाथ दुगजे | १२३ | भानुदास नारायण चौधरी |
| ९६ | मधुकर लक्ष्मण वाणी (कातेकर) | १२४ | ललितकुमार जवरीलाल मोदी |
| ९७ | सुनिल ताराचंद भटेवरा | १२५ | रंजन पुंजाराम ठाकरे |
| ९८ | विलास भाऊसाहेब ओतुरकर | १२६ | विशाल जयप्रकाश जातेगांवकर |
| ९९ | रामदास काशिनाथ शेवाळे | १२७ | शितल सुरज भट्टड |
| १०० | जयराम कारभारी राऊत | १२८ | देवेंद्र हरीलाल पटेल |
| १०१ | दिपाली रविंद्र सोनार | १२९ | सुरज जगदीश भट्टड |
| १०२ | संजय किशोर पाठक | १३० | प्रकाश विश्वनाथ क्षिरसागर |
| १०३ | नारायण सावळीराम झाडगे | १३१ | कांतीलाल भागचंद जैन |
| १०४ | राजेंद्र भिका सोनवजे | १३२ | बुढाऐर तेज बहाद्दुर कमल सिंग |
| १०५ | गोविंद रामभाऊ गायकवाड | १३३ | आनंद अजित बागमार |
| १०६ | सुनिल नामदेव क्षिरसागर | १३४ | सुवेश रघुनाथ जगताप |
| १०७ | मंदाकिनी चंद्रशेखर जाधव | १३५ | भट्टु शंकर वाणी |
| १०८ | दशरथ राजाराम देवरे | १३६ | सपना आनंद बागमार |
| १०९ | सुनिता बाळासाहेब सोमवंशी | १३७ | राहुल प्रविणचंद डुंगरवाल |
| ११० | पियुष प्रकाश शिरसाठ | १३८ | वैशाली जालिंदरनाथ जाधव |
| १११ | प्रकाश जगन्नाथ शिरसाठ | १३९ | चंद्रकांत तुलशीराम अहिरे |
| ११२ | खुशाल राजेंद्र राऊत | १४० | उज्वला महेंद्र सुर्यवंशी |
| ११३ | वंदना संपत जाधव | १४१ | विजय राजाराम साने |
| ११४ | पल्लवी कल्पेश पारख | १४२ | प्रिती निलेश बेदमुथा |
| ११५ | मानसी कल्पेश पारख | १४३ | भगवंत तुलशीराम अहिरे |
| ११६ | सुनिल चंद्रभान शिरसाट | १४४ | मधुकर धर्मा बिरारी |

| अ.क्र. | नांव | अ.क्र. | नांव |
|---|---|---|---|
| १४५ | सचिन मधुकर चांदवडे | १७३ | हेमकांत गजानन पवार |
| १४६ | अक्षय राजेंद्र सोनवणे | १७४ | बापुराव काशिनाथ वाणी |
| १४७ | प्रल्हाद सदाशिव धुमाळ | १७५ | देवराम हिलाल सैंदाणे |
| १४८ | मधुकर सयाजी रकिबे | १७६ | संजय एकनाथ नेरकर |
| १४९ | सुभाष बद्रीनारायण जाजु | १७७ | धनराज तुळशीराम चौधरी |
| १५० | निरज जगदीश भट्टड | १७८ | द्रुपदा भास्कर शिंदे |
| १५१ | प्रशांत अशोक दिवे | १७९ | हेमंत भास्कर शिंदे |
| १५२ | पांडुरंग नारायण पिडामे | १८० | उत्तम भिकाजी कर्डेक |
| १५३ | वरूण अनिल शिरसाठ | १८१ | दत्तात्रय सावळेराम वाघ |
| १५४ | स्नेहा योगेश कासार | १८२ | सुमन दत्तात्रय वाघ |
| १५५ | सुखदेव विश्वनाथ आहेर | १८३ | मधुकर गणपत संधान |
| १५६ | शाम रामनाथ भुसे | १८४ | निलेश अशोक सोनजे |
| १५७ | नयन सुभाष भंडारी | १८५ | संजय फकिरराव काश्मिरे |
| १५८ | राजमल टिकमचंद जैन | १८६ | भिकालाल विश्वनाथ कोठावदे |
| १५९ | सविता ओंकार शिंदे | १८७ | ओमप्रकाश नंदलाल काबरा |
| १६० | गितांजली गणेश भडांगे | १८८ | सुभाष मनोहरमल चोरडिया |
| १६१ | रविंद्र भगवंतराव पाटील | १८९ | सुरेश विठ्ठल भोळे |
| १६२ | चेतन बापु सैंदाणे | १९० | फजलु रहेमान अहमद शेख |
| १६३ | बाळु टिकमचंद जैन | १९१ | भिमराव शंकर चव्हाण |
| १६४ | तानाजी कारभारी सुर्यवंशी | १९२ | जावेद ईब्राहिम शेख |
| १६५ | राजेंद्र बाळकृष्ण गुरव | १९३ | गणेश बबन गिते |
| १६६ | विलास देविदास पगारे | १९४ | स्मिता प्र कासार |
| १६७ | अविनाश मुळचंद गोठी | १९५ | पद्माकर शंकर दशमुखे |
| १६८ | विजय सोमनाथ सोनवणे | १९६ | कमलेश पारसमल कुमट |
| १६९ | हरीभाऊ कारभारी वाकचौरे | १९७ | पारसमल पन्नालाल कुमट |
| १७० | दिवेश पांडुरंग लोखंडे | १९८ | जितेंद्र मांगीलाल भंडारी |
| १७१ | विजय शांतीलाल बाफणा | १९९ | मांगीलाल केवलचंद भंडारी |
| १७२ | गणेश पांडुरंग लोखंडे | २०० | संतोष मांगीलाल भंडारी |

| अ.क्र. | नांव | अ.क्र. | नांव |
|---|---|---|---|
| २०१ | रमेश बाबुलाल दशपुते | २२३ | सिध्देश्वर रमणलाल दवे |
| २०२ | मदन बाबुराव जाधव | २२४ | दिपक रमणलाल दवे |
| २०३ | विवेक पांडुरंग चव्हाण | २२५ | देवेंद्र शांताराम सोनार |
| २०४ | मोहनलाल जसराम कुमट | २२६ | रविंद्र शांताराम सोनार |
| २०५ | कांतीलाल मदनलाल जयस्वाल | २२७ | अशोक सिताराम वाघ |
| २०६ | प्रितम विजय अवसरकर | २२८ | किशोर गोविंद शिनकर |
| २०७ | ऋषिकेश रमेश महाले | २२९ | हिरा नारायण झाडगे |
| २०८ | अशोक मोहनलाल साखला | २३० | मोहनीराज दत्तात्रय खानकरी |
| २०९ | अथर्व दिलीप पाठक | २३१ | संतु दगडु सदगीर |
| २१० | चेतन दामोदर कापडणीस | २३२ | मिरा संतु सदगीर |
| २११ | ॲड.प्रविण पंढरीनाथ अमृतकर | २३३ | हेमंत शांतीलाल जैन |
| २१२ | विजयकुमार गणेशदास लोया | २३४ | तुकाराम लक्ष्मण मांदळे |
| २१३ | मनिषा चेतन कापडणीस | २३५ | तुकाराम भिकाजी शिंदे |
| २१४ | सोनाली वैभव कापडणीस | २३६ | भुषण पन्नालाल मुथा |
| २१५ | रामराव विष्णुपंत कमोद | २३७ | उषाबाई महावीर ललवाणी |
| २१६ | सुर्यभान बबन आगवणे | २३८ | सचिन पारसमल छाजेड |
| २१७ | रविंद्र दत्तात्रय कोळपकर | २३९ | हिराबाई पारसमल छाजेड |
| २१८ | शांताराम मोतीराम सोनार | २४० | राखी संतोष भंडारी |
| २१९ | बुवाजी विठ्ठल पगार | २४१ | मुकेश बाबुलाल पारख |
| २२० | मोतीराम सिताराम भांमरे | २४२ | बाबुलाल जुगराज पारख |
| २२१ | योगेश मधुकर कोतकर | २४३ | हेमंत हरीभाऊ धात्रक |
| २२२ | लालचंद पुखराज निमाणी | २४४ | वसंत निवृत्ती गिते |

सभेचा वृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

सर्व प्रथम बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सोहनलाल मोहनलाल भंडारी यांनी सर्वांचे स्वागत करुन सभेस उपस्थित राहिल्याबदद्ल आभार मानले व बँकेचे संचालक श्री.विजय राजाराम साने यांचा रजेचा अर्ज मंजूर करण्यात आला. तसेच निवेदन केले की, आदरणीय व्यासपीठ व उपस्थित सभासद बंधुभगिनींनो सभेची वेळ सकाळी ११.०० वाजताची होती त्यामुळे कोरम पूर्ण झाल्याने सभेच्या कामकाजास रितसर सुरूवात करण्यात येत आहे.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विश्राम दीक्षित यांनी अहवाल वर्षात जे थोर शास्त्रज्ञ, राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्यिक क्षेत्रातील कार्यकर्ते, बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, सेवक, ज्ञात–अज्ञात जे पंचतत्वात विलीन झाले त्यांना सभेने दोन मिनीटे उभे राहुन आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सोहनलाल मोहनलाल भंडारी यांनी ३१ मार्च २०२४ अखेरची ची गुणात्मक व संख्यात्मक प्रगती विविध पैलुंच्या माध्यमातून सादर करून बँकेची आर्थिक परिस्थिती सभेसमोर पुढीलप्रमाणे मांडली व आपले मनोगत व्यक्त करतांना बँकेच्या प्रगतीचा आलेख थोडक्यात सभासदांना समजावुन सांगितला या वेळी बोलतांना मी आपल्या बँकेच्या ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो.

सर्व प्रथम आपणा सर्वाचे जाहीर आभार मानतो की आपण बँकेचे जेष्ठ संचालक श्री.वसंत गिते व माझ्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन पुन्हा आपली सेवा करण्याची संधी दिली. मी आपणा सर्वांना आश्वस्त करू इच्छितो की, आपण दाखविलेल्या विश्वासास मी व माझे संचालक मंडळ तडा जाऊ देणार नाही.

सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात ढोबळ (ग्रॉस) एनपीए ६.४४ टक्यापर्यंत आला असुन निव्वळ (नेट) एनपीए ०.०० टक्के राखण्यात व पुन्हा बँकेस भरघोस नफा मिळवून देण्यात संचालक मंडळ यशस्वी झाले. हे केवळ बँकेचे सन्माननीय सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांनी

केलेल्या सहकार्य तसेच संचालक मंडळ व सर्व सेवकांच्या परिश्रमामुळे शक्य झाले आहे.

दि.०६.०१.२०१९ पासुन म्हणजेच जेव्हा पासुन सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवुन बँकेचा कारभार आमचे हाती सुपुर्द केला तेव्हापासुन बँकेचा प्रगतीचा आलेख हा उंचावतच गेलेला आहे. तसेच आपणास सांगु इच्छितो की सर्व सेवक तसेच संचालकांच्या परिश्रमाने बँकेने राईट ऑफ केलेल्या रू.३२० कोटीपैंकी रू.१४७ कोटींची वसुली झालेली आहे.

तसेच सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात आपण बँकेचा एकुण व्यवसाय ३२२३.९९ कोटींपर्यंत नेण्यास यशस्वी झालेले आहे यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत ४२५.३७ कोटी (१४.६८%) ने लक्षणीय वाढ झालेली दिसुन येते. रू.५००० कोटींचा एकुण व्यवसायाचा टप्पा गाठण्याकरीता सर्व संचालक मंडळ व सेवक आपणा सर्वांच्या मदतीने प्रयत्नात आहे. सदरचे ध्येय गाठण्यासाठी आपण कर्ज वाढीसाठी प्रयत्नशिल असुन वाहन कर्जाचे आपले व्याजदर सर्वात किफायतशीर आहेत सलग दुसऱ्या वर्षी आपण वाहन मेळावा सुरू केला आहे. सदर मेळाव्यात सर्व नामांकित कंपन्यांचे वाहन आपणास एकाच छताखाली बघावयास मिळाले जेणेकरून ग्राहकाला आपल्या पसंतीचे वाहन निवडणे सोयीचे होते. हया कर्जप्रकारात कर्ज मंजूरी ही एक दिवसात होते अशी व्यावसायिक पध्दती आपण राबविण्यात यशस्वी झालो आहोत. तसेच बँकेच्या विविध शाखांनी सुध्दा दोन चाकी वाहनाचे मेळावे आयोजित केले होते. त्यामुळे बँकेच्या कर्जवाढीस चांगल्या प्रकारे मदत झाली आहे. सदरचे मेळावे यापुढे दरवर्षी घेण्याचा मानस आहे.

आपल्या बँकेची व्यवसाय वाढ तसेच भविष्यकालीन नियोजन व बँकेच्या भविष्यकालीन प्रगतीच्या दृष्टिने यावर्षी सुध्दा भारतीय रिझर्व्ह बँकेची मान्यता प्राप्त संस्था इंडिया रेटींग अॅण्ड रिसर्च (इंडिया.रा) यांचे कडुन बँकेचे क्रेडीट रेटींग करण्यात आले असुन या अनुषंगाने सदर संस्थेने आपल्या बँकेचे रेटींग केले असुन आपल्या बँकेस आर्थिक वर्ष २०२३–२४ "IND-BB/-Stable" रेटींग्स  हे सलग दुसऱ्या वर्षी राखता आले आहे.

आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी बी–टू–बी व नॅफकॅब नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या भारतरत्न सहकारीता सन्मान या कार्यक्रमाप्रसंगी आपल्या बँकेला ''उत्कृष्ट मल्टिस्टेट को–ऑपरेटीव्ह बँक'' व ''उत्कृष्ट मोबाईल बँकिंग'' या कॅटेगरीत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. हे सर्व आपण बँकेवर दाखविलेल्या विश्वासाचे द्योतक आहे.

<u>**नवीन कर्जयोजना**</u>

अ) बँकेच्या सभासद व ग्राहकांचे वीज बिल कमी व्हावे म्हणुन वाजवी दरात पर्यावरण पूरक **नामको ग्रीन एनर्जी (सोलर)** कर्ज योजना कार्यान्वित केली आहे. तसेच डॉक्टर्स, सी.ए, इंजिनिअर्स, आर्किटेक्ट, वकील यांना विविध कारणांसाठी **प्रोफेशनल कर्ज** योजना सुरू केलेली असुन सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा.

ब) तसेच बँकेच्या सभासद व ग्राहकांच्या मुला–मुलींचे उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करण्याकरीता कमीत कमी व्यादरात **''नामको विद्यासाधना शैक्षणिक कर्ज''** योजना आणली असुन विद्यार्थ्यांना देशांतर्गत व देशाबाहेर उच्च शिक्षण देणे, शिक्षणासाठी पाठविणे सुखर होणार असुन अनेक सभासद, ग्राहक सदर योजनेचा लाभ घेत असुन आपण सुध्दा सदर योजनेचा भाग व्हावे जेणेकरून देशाचे पुढील भविष्य चांगल्या पध्दतीने घडविण्यास आपला सर्वांचा हातभार लागेल.

क) लघु मध्यम (MSME) उद्योजकांसाठी सर्व प्रकारच्या कर्ज योजनांसाठी बँक कटिबध्द आहे. या प्रकारात Take Over कर्ज प्रकारात बँक Minimum Interest Rate ८.५०% हा आकारत आहे. काही शर्तींच्या आधारावर हा व्याज दर लावण्यात येतो.

## दृष्टीक्षेपात अहवालातील ठळक बाबी

(आकडे लाखात)

| अ.नं. | तपशील | ३१ मार्च २०२३ | ३१ मार्च २०२३ | वाढ/घट | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वसूल भागभांडव | ५१९६.०२ | ५१४८.३७ | –४७.६५ | –०.९२ |
| २ | राखीव अतिरिक्तनिध | ३७८८८.७१ | ३९१५०.३१ | १२६१.६० | ३.३३ |
| ३ | ठेवी | १८५६२८.३० | २१८४३८.४९ | ३२८१०.१९ | १७.६८ |
| ४ | कर्जे | ९४२३३.३० | १०३९६०.६५ | ९७२७.३५ | १०.३२ |
| ५ | गुंतवणूक | १२२१५१.३१ | १४४८६५.१७ | २२७१३.८६ | १८.५९ |
| ६ | करपूर्वनफा | ४७९७.०८ | ५४०१.११ | ६०४.०३ | १२.५९ |
| ७ | निव्वळ नफा | ३४३३.०८ | ४११६.११ | ६८३.०३ | १९.९० |
| ८ | सभासद संख्या | १९४१४८ | १९६३८९ | २२४१.०० | १.१५ |
| ९ | भांडवल पर्याप्तताप्रमाण | ३४.९९% | ३१.८३% | –०.०३ | –८.८६ |

उपरोक्त नमुद तक्ता विचारात घेतला असता अतिरिक्त निधीमध्ये ३.३३%, ठेवींमध्ये १७.६८%, कर्जामध्ये १०.३२%, व नफ्यामध्ये १९.९०% इतकी भरीव वाढ झालेली आहे.

३१.०३.२०२४ अखेर बँकेचा ढोबळ एनपीए ६.४४% व निव्वळ एनपीए ०.००% इतका आहे, तसेच ३१.०३.२०२३ अखेर निव्वळ नफा ३४ कोटी ३३ लाख ०८ हजार इतका झाला होता तर मार्च २०२४ अखेर वैधानिक तरतूदी वजा जाता बँकेला रू. ४१ कोटी १६ लाख ११ हजार इतका निव्वळ नफा झालेला आहे. निव्वळ नफ्यात मागील वर्षाच्या तुलनेत १९.९०% इतकी वाढ झालेली आहे.

बँकेचे सनदी लेखापाल मे बिरारी कुलकर्णी अँड कंपनी नाशिक यांनी या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करून बँकेच्या संपूर्ण कामकाजाबद्द्ल समाधान व्यक्त केले आहे. या वर्षासाठी त्यांनी ऑडीट वर्ग **''अ''** दिला आहे.

गेल्या ६५ वर्षापासुन बँकेच्या मान्यवर सभासदांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळे बँकेला प्रगती साधता आली. त्यांनी केलेल्या सहकार्यामुळेच तसेच अनेक सामाजिक

कार्यकर्ते, संस्था, हितचिंतक, ग्राहक व ज्ञात–अज्ञात व्यक्तींनी उत्तम नावलौकिक प्राप्त करून ध्येय प्राप्तीसाठी बँकेला अनेक प्रकारची मदत केली, त्यांचे मी आभार मानतो. तसेच भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई, मा.संयुक्त सचिव आणि केंद्रीय निबंधक सहकारी संस्था, नवी दिल्ली, मा.आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था पुणे, मा.सहआयुक्त सहकारी संस्था, नाशिक, नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, नाशिक तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय फेडरेशन यांचा मी अत्यंत ऋणी आहे. विविध प्रसार माध्यमे त्यांचे संपादक, प्रतिनिधी, लेखा परिक्षक, कायदा सल्लागार, शाखा कार्यालयांचे जागा मालक, बँकेचे वरिष्ठ व्यवस्थापन, अधिकारी व सेवकवृंद आणि इतर मान्यवर ज्यांनी नेहमीच आपले अनमोल सहकार्य देऊन आपला मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांचेही मी मनापासून आभार मानतो.

बँकेचा प्रगतीचा अहवाल मला आपणासमोर सादर करण्याची जी संधी दिली त्याबद्द्ल मी आपला आभारी आहे. बँकेचा कौशल्यपुर्ण व्यवहार आपले सहकार्य यामुळे प्रगतीचा आलेख वाढता राहील असे मी नम्रपणे नमूद करतो. तसेच आपणा सर्वाचे सहकार्य असेच निरंतर सुरू ठेवावे ही आपणास विनंती करतो. हा संपुर्ण अहवाल आपल्यासमोर ठेवत आहे.

त्यानंतर बँकेचे जेष्ठ संचालक श्री.हेमंत धात्रक यांनी बँकेच्या नवीन सुरू केलेल्या मोबाईल टेक्नोलॉजी व इतर सुविधांबद्द्ल सर्व सभासदांना माहिती दिली. त्यावर सर्व सभासदांनी संचालकांचे नाविन्यपुर्ण कार्याबद्द्ल अभिनंदन केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांनी केले.

अहवालातील मुद्रणदोष दुरूस्ती वाचन श्री विश्राम दीक्षित यांनी पुढील प्रमाणे केले.

| अ.क्र. | पान नं. | दुरुस्ती |
|---|---|---|
| १ | ०४ | भागभांडवल – बँकेच्या वसुल भागभांडवलात रूपये ४७ लाख ६५ हजार ६०० ने वाढ झालेली असुन बँकेच्या सभासद संख्येत २२४१ ने वाढ झाली आहे. यामध्ये वाढ झालेली असुन च्याऐवजी घट झालेली आहे असे वाचण्यात यावे. |

वरील प्रमाणे मनोगताचे वाचन झाल्यानंतर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांनी अध्यक्षांचे आभार मानले व सभेच्या कामकाजास रितसर सुरूवात करण्यात आली.

विषय क्र १. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२७ सप्टेंबर २०२३ व विशेष सर्वसाधारण सभा दि.२७ मार्च २०२४ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र १. मागील सभा दि.२७ सप्टेंबर २०२३ व विशेष सर्वसाधारण सभा दि.२७ मार्च २०२४ रोजीचे इतिवृत्त सभास्थानी उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे नमुद करून त्याचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांनी केले. यावेळी सभासद श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील यांनी सर्वांना अहवाल व इतिवृत्त मिळाले असुन सदर दोन्ही बाबींना मंजूरी देण्यास हरकत नाही असे सभेस सूचविले त्यावर सभासद श्री.देविदास काशिनाथ शिरूडे यांनी श्री.कातड पाटील यांना अनुमोदन दिले सभासद श्री.विजय बोरा यांनी यावेळी मागील सभेत मी बँकेच्या जादा झालेल्या खर्चास अनुमती दिलेली नसतांना व इतिवृत्तात सर्व उपस्थित सभासदांनी सदर विषयास मंजूरी दिली असे लिहिलेले आहे त्यावर कातड पाटील यांनी सर्व उपस्थित सभासदांनी म्हणजेच त्याचा अर्थ बहुमताने मंजूरी दिली असा होतो त्यामुळे त्यात श्री.बोरा यांनी केलेला युक्तिवाद योग्य नसल्याचे सांगितले, त्यावर सभेचे समाधान झाल्याने मागील इतिवृत्ताला सभेने बहुमताने मंजुरी दिली.

सुचक : श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील

अनुमोदक : देविदास काशिनाथ शिरूडे

ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.२ सन २०२३–२०२४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवालाबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र.२ सन २०२३–२०२४ या वर्षाचा अहवाल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दिक्षीत यांनी सभेसमोर मांडला. त्यावर सभासद श्री.भिकचंद

केवलचंद धाडीवाल यांनी सदरचा अहवाल सर्व सभासदांना मिळाला असुन वाचण्याची आवश्यकता नसल्याचे सभेस सूचविले त्यावर सभासद श्री.सागर महिपत देसाई यांनी बँकेचा अहवाल हा अतिशय उत्तम असुन त्यातील लिखाण सुवाच्छ व चांगल्या प्रतिचे आहे. अहवाल इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेमध्ये एकत्रित छापल्याबद्द्ल सर्व संचालकांचे अभिनंदन केले येणेप्रमाणे सर्व सभासदांनी बहुमताने सदर विषयास मंजुरी दिली.

सुचक : श्री.भिकचंद केवलचंद धाडीवाल
अनुमोदक : श्री.सागर महिपत देसाई
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.३. दि.३१ मार्च २०२४ अखेरची ऑडिटेड आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा– तोटा पत्रक यावर विचार विनीमय करणे व मान्यता देणे.

ठराव क्र ३ दि.३१ मार्च २०२४ अखेरची आर्थिकपत्रके, ताळेबंद, नफा– तोटापत्रक व त्या सोबतची परिशिष्टांची माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दिक्षीत यांनी सभेला दिली.त्यावर सभासद श्री.प्रकाश विश्वनाथ क्षिरसागर यांनी अहवाल सर्वांना भेटलेला असुन अहवालातील पान नं.१० ते ३७ वर बँकेची सर्व आर्थिक माहिती दिलेली आहे व ती ऑडीटेड असल्याने योग्यच असेल त्यामुळे सदर विषयास सर्व सभासदांनी मंजुरी देण्यास हरकत नाही असे सभेस सुचविले त्यास सभासद श्री.कांतीलाल भागचंद जैन यांनी अनुमोदन दिले त्यावर सर्व सभासदांचे एकमत होऊन सदर विषयास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

सुचक : श्री.प्रकाश विश्वनाथ क्षिरसागर
अनुमोदक : श्री.कांतीलाल भागचंद जैन
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.४ सन २०२३–२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

ठराव क्र.४ सन २०२३–२०२४ या सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांनी तयार केलेला व बँकेला प्राप्त झालेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल तसेच त्याबाबत बँकेने तयार केलेल्या दोषदुरुस्ती अहवालाचे वाचन बँकेचे ऑडीट विभागप्रमुख श्री.स्वप्निल लिलके यांनी केले. बँकेला ऑडीट वर्ग ''अ'' मिळाला आहे. तसेच त्यात कुठल्याही प्रकारचे गंभीर दोष नाही असे नमुद केले. त्यावर सभासदांनी बँकेचे अभिनंदन केले व सभेत सविस्तर चर्चा करण्यात येऊन अहवाल योग्य व बरोबर असल्याने त्यांची नोंद घेण्यात आली.

सुचक : श्री.श्यामदास नरहर दशपुत्रे
अनुमोदक : श्री.सुनिल ताराचंद भटेवरा
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.५. दि.३१ मार्च २०२४ अखेर अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

ठराव क्र ५ बँकेचे लेखा विभाग प्रमुख श्री गंगाधर तारगे यांनी अहवाल पा.क्र.३९ वर छापलेल्या दि.३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चाच्या माहितीचे वाचन केले त्यावर सभासद श्री.पंडीतराव कातड पाटील यांनी सभेस सध्याचा महागाईचा विचार करता अंदाज चुकू शकतो व बँकेने केलेला खर्च हा अनावश्यक नसेल कारण सर्व संचालकांना आपण विश्वासाने निवडुन दिलेले आहे त्यामुळे सभेचा जास्त वेळ वाया न घालवता विषयास मंजूरी देण्यास हरकत नसावी असे सभेस सूचविले त्यास मा.सभासद श्री.महेंद्र चंद्रभान शिरसाट यांनी अनुमोदन दिले व सर्व उपस्थित सभासदांनी सदर विषयास बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील
अनुमोदक : श्री.महेंद्र चंद्रभान शिरसाट
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.६ नफावाटणी व लाभांश वाटपास मान्यता देणे.

ठराव क्र.६ दिनांक ३१ मार्च २०२४ रोजीच्या अहवालातील नफावाटणी जी बँकेने तयार केली आहे, ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्राम दीक्षित यांनी सभेस वाचून दाखविली. सदरची नफा वाटणी खालील प्रमाणे –

| **तपशील** | **रक्कम** |
|---|---|
| निव्वळ नफा विनियोगासाठी उपलब्ध | ४१,१६,१०,५३७.५१ |
| २५ टक्के राखीवनिधी | १०,९८,४७,८४३.५१ |
| १० टक्के आपत्कालीन निधी | ४,११,६१,०५४.०० |
| १ टक्का शैक्षणिक निधी | ४१,१६,१०५.०० |
| १ टक्का धर्मदाय निधी | ४१,१६,१०५.०० |
| १ टक्का सहकार पुर्नवसन, पुर्नरचना आणि विकास निधी | ४१,१६,१०५.०० |
| १५ टक्के लाभांश | ७,५७,३४,३२५.०० |
| १० टक्के सानुग्रह अनुदान | २,२५,१९,०००.०० |
| गुंतवणूक चढउतार निधी | १२,००,००,०००.०० |
| इमारत निध | ३,००,००,०००.०० |
| **एकुण** | **४१,१६,१०,५३७.५१** |

यावर चर्चा होवून लाभांश वाटपाविषयी बोलतांना सभासद श्री.देविदास काशिनाथ शिरूडे यांनी अहवालातील दोष दुरूस्तीत राखीव निधी, लाभांश, सानुग्रह अनुदान इ. आकडेवारींमध्ये तफावत दिसत असल्याचे वाटत आहे. त्यावर मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना नफावाटणी बाबत सर्व हिशोब समजवुन सांगितला त्यावर त्यांचे समाधान झाले. परंतु मी मालेगांव येथील सभासद असुन मला आतापर्यंत एकही अहवाल प्राप्त झालेला नसुन सभासदांना अहवाल वेळेत पोहचविला पाहिजे अशी सुचना केली. त्यावर सभासद श्री. बुढाऐर तेज बहाद्दुर कमल सिंग यांनी सांगितले की, अहवाल हे घरपोहच न देता बँकेच्या शाखा कार्यालयांमध्ये ठेवण्याचा ठराव आपण सभासदांनीच केलेला आहे त्यामुळे अहवाल घरपोहच देण्याचा प्रश्नच येत नाही तसेच बँक नियमाप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस विविध वृत्तपत्रांमध्ये व बँकेच्या शाखा कार्यालयांमध्ये प्रसिध्द करत असते. त्यामुळे प्रत्येक सभासदास वैयक्तिक नोटीस किंवा अहवाल मागणे योग्य नाही त्यावर सभासद श्री.पंडीतराव कातड पाटील यांनी श्री. बुढाऐर यांनी दिलेली माहिती योग्य असुन श्री.शिरूडे यांनी सर्व माहिती जाणुन घेऊन मगच प्रश्न करावा असे सांगितले तसेच अहवालामधील पान क्र.४ वर नफावाटणी सविस्तर दिलेली असुन ती योग्य वाटते असे सभेस सूचविले त्यावर सभेचे समाधान झाल्याने चर्चेनंतर नफावाटणी व लाभांश योग्य असल्याने त्यास बहुमताने मान्यता देण्यात आली

सुचक : श्री.बुढाऐर तेज बहाद्दुर कमल सिंग
अनुमोदक : श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.७ संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

ठराव क्र.७ संचालक व त्यांच्या नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती पान क्र.३४ वर दिलेली असुन ती भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमास अनुसरून असल्याचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस सांगितले त्यावर सभेचे समाधान होऊन त्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

सुचक : श्री.लालचंद पुखराज निमाणी
अनुमोदक : श्री.प्रविण पंढरीनाथ अमृतकर
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.८ रिझर्व्ह बँकेच्या नियमांना अधिन राहून एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत तडजोड केलेल्या पात्र थकीत कर्जखात्यांना मान्यता देणे.

ठराव क्र.८ रिझर्व्ह बँकेच्या नियमांना अधिन राहून एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत बँकेने थकबाकीदार सभासदांना तडजोड करून खाते बंद करण्यासाठी जे निकष ठरविले आहेत व त्याप्रमाणे त्यांची खाती बंद केली आहेत असे नमुद करून सर्व खात्यांची माहिती सभेस देण्यात आली. त्यांना मंजूरी देण्यात यावी अशी विनंती सभेला करण्यात आली. त्यास सर्व उपस्थित सभासदांनी खालील कोष्टकांप्रमाणे तडजोडीने बंद केलेल्या खात्यांना मंजुरी दिली.

| **कालावधी** | **खाते संख्या** | **मुद्दल + व्याज एकुण रक्कम रू** | **तडजोड वसुल रक्कम रू** | **व्याजात दिलेली सुट रक्कम रू** |
|---|---|---|---|---|
| ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ | २७९ | ७३,७५,५१,३७२/– | ४२,३८,२७,५२१/– | ३१,३७,२३,८५१/– |

तसेच यापुढे ज्या थकबाकीदार कर्जदारांचे अर्ज येतील त्यांना नियमाप्रमाणे तडजोड करून खाते बंद करून घेण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यास सभेने मंजूरी दिली.

सुचक : श्री.संजय एकनाथ नेरकर

अनुमोदक : श्री.किशोर गोविंद शिनकर

ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.९ सन २०२४–२०२५ सालाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकाला मान्यता देणे.

ठराव क्र.९ सन २०२४–२०२५ सालाच्या अंदाज पत्रकाबाबतची माहिती बँकेचे लेखा विभाग प्रमुख श्री गंगाधर तारगे यांनी सभेला वाचुन दाखविली. अंदाजपत्रकाचे आम्ही वाचन केलेले आहे ते बरोबर आहे अशी सुचना

सभासद श्री.आनंद अजित बागमार यांनी केली त्यावर सर्व सभासदांचे एकमत होऊन सदर अंदाजपत्रकास सर्व सभासदांनी बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री .आनंद अजित बागमार

अनुमोदक : श्री.हेमंत भास्कर शिंदे

ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१० भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि.२७ एप्रिल २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करणेकामी संचालक मंडळाने अंतिम केलेली नावे व तसा भारतीय रिझर्व्ह बँकेस पाठविलेल्या प्रस्तावाची नोंद घेऊन मान्यता देणे.

ठराव क्र.१० बँकेने दि.३१.०७.२०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेस सन २०२४–२५ करीता लेखा परिक्षक म्हणुन ३ नावे कळविले असल्याची माहिती ऑडीट विभागप्रमुख श्री.स्वप्निल लिलके यांनी सभेस दिली त्यातील जे नाव भारतीय रिझर्व्ह बँक मान्य करेल त्यास सर्व सभासदांनी मंजूरी दयावी अशी सूचना सभेस केली त्यास सभेने कुठलाही आक्षेप न घेता बहुमताने मंजूरी दिली.

सुचक :श्री.मोहनलाल जसराज कुमट

अनुमोदक :श्री.रोशन प्रकाश आढाव

ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.११ सन २०२५–२०२६ या वर्षासाठी कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकीचा अधिकार संचालक मंडळास देणे.

ठराव क्र.११ सन २०२५–२०२६ या वर्षासाठी कंकरंट ऑडीटर्सच्या नेमणूकीचे सर्वस्वी अधिकार बँकेच्या संचालक मंडळास देण्यात यावे असे बहुमताने ठरले.

सुचक : श्री.काकड विजय लक्ष्मण

अनुमोदक : श्री.जयप्रकाश रामकिसन जातेगांवकर

ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१२ संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीबाबत विचार विनिमय करून मान्यता देणे.

ठराव क्र १२ बँकेच्या सन २०२२–२०२३ च्या अहवालातील पान क्रमांक ४१ ते ४४ वरील पोटनियम क्रमांक २, ५(४), १३(१), २२(२), ३१(४), ३१(५), ३५(२१)(अ) व ४३ (एच) यातील प्रस्तावित दुरुस्ती मसुदा बँकेचे अध्यक्ष श्री.सोहनलाल मोहनलाल भंडारी यांनी सभेला पुढील प्रमाणे वाचून दाखविला.

| पोट नियम क्रमांक | सध्याचा पोट नियम | दुरूस्ती नंतरचा पोट नियम | दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| २ | बँकेचे नोंदणीकृत कार्यालय हे ए/१६/१७, औद्योगिक वसाहत, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, बाबुभाई राठी चौक, सातपूर, नाशिक – ४२२००७ येथे असेल. त्यात पुढे काही बदल झाल्यास तो नोंदणी अधिकारी यांना बदल झाल्याचे तारखेपासून १५ दिवसांचे आंत कळविला जाईल. तसेच त्याची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रातून केली जाईल. | बँकेचे नोंदणीकृत कार्यालय हे ए/१६/१७, औद्योगिक वसाहत, नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग, बाबुभाई राठी चौक, सातपूर, नाशिक – ४२२००७ mail id - helpdesk@namcobank.in येथे असेल. त्यात पुढे काही बदल झाल्यास तो नोंदणी अधिकारी यांना बदल झाल्याचे तारखेपासून १५ दिवसांचे आंत कळविला जाईल. तसेच त्याची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रातून केली जाईल. | बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ (भारतीय राजपत्र दिनांक ३ ऑगस्ट २०२३) नुसार परिपुर्तता करण्यासाठी |
| ५ (४) | मे.निबंधकाचे परवानगीने व सभासदास व इतरांस कर्ज अथवा उचल तारणावर अथवा तारणाशिवाय देणे. | भारतीय रिझर्व्ह बँक यांचे कर्ज देण्याचे निकष, बँकेचे कर्ज नियम आणि संचालक मंडळाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या कर्ज नियमास अधीन राहुन सभासद व इतरांस कर्ज अथवा उचल तारणावर अथवा तारणाशिवाय देणे. | कर्ज वितरणात सुसुत्रता येण्याकरीता. |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ (१) | एखादया सभासदास आपला एक अगर अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाचे नांवाने वर्ग केले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ''वर्ग फी'' म्हणून रु. १० भरली पाहिजे. | एखादया सभासदास आपले सर्व समभाग एकत्रित किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाचे/व्यक्तीचे नांवाने वर्ग केले असतील त्याचे नांव भागाच्या रजिस्टर मध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी प्रत्येक भाग दाखल्याबरोबर ''वर्ग फी'' म्हणून रु. १० भरली पाहिजे. | बँकेच्या जुने किंवा नवीन सभासदांचे भागवर्ग करण्याचे प्रक्रियेत सुसुत्रता येणेकरीता |
| २२ (२) | पोटनियम क्रमांक १९(४) नुसार विशेष सर्वसाधारण सभा, सभासदांच्या मागणीनुसार अगर निबंधक यांनी केलेल्या मागणीचे तारखेपासून एक महिन्याचे आंत बोलाविली पाहिजे. विशेष सर्वसाधारण सभेच्या सुचनापत्रात (नोटीसीत) मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करुनच सभा बोलाविली पाहिजे. अशा सभेत विषयपत्रिकेवर फक्त मागणी केलेला विषयच राहील. सभासदाचे नोंदलेल्या पत्त्यावर अशा सभेचे सुचनापत्र (नोटीस) सभेच्या तारखेपुर्वी कमीतकमी सात दिवस अगोदर पाठविले पाहिजे. | पोटनियम क्रमांक १९(४) नुसार विशेष सर्वसाधारण सभा, सभासदांच्या मागणीनुसार अगर निबंधक यांनी केलेल्या मागणीचे तारखेपासून एक महिन्याचे आंत बोलाविली पाहिजे. विशेष सर्वसाधारण सभेच्या सुचनापत्रात (नोटीसीत) मागणी केलेल्या विषयांचा अंतर्भाव करुनच सभा बोलाविली पाहिजे. अशा सभेत विषयपत्रिकेवर फक्त मागणी केलेला विषयच राहील. तसेच सभेची सुचना बँकेचे अधिकृत वेबसाईट, स्थानिक वृत्तपत्र, बँकेच्या इतर डिजीटल माध्यमांवर व सर्व शाखांचे नोटीस बोर्ड येथे प्रसिध्द करण्यात येईल. | बँकेच्या वार्षिक किंवा विशेष सर्वसाधारण सभेची सुचना सर्व सभासदांपर्यंत पोहचविणेकरीता |

| | | | |
|---|---|---|---|
| **३१ (४)** | नवीन | प्रत्येक संचालकाचा संस्थेवर संचालक म्हणुन राहण्याचा कालावधी हा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत राहील. | बँकिंग रेग्युलेशन ॲक्टच्या निर्देशानुसार परिपुर्तता करण्यासाठी |
| **३१ (५)** | नवीन | बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ नुसार संचालक पदास आवश्यक असणारी पात्रता कलम १० (अ) प्रमाणे सर्वदृष्टिने लागू राहील | बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ (भारतीय राजपत्र दिनांक ३ ऑगस्ट २०२३) नुसार |
| **३५ (२१) (अ)** | सात संचालक सदस्यांची एक कार्यकारी समिती संचालक स्थापन करेल. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राहतील. याशिवाय संचालक मंडळास समित्या किंवा उपसमित्या (तीन पेक्षा जास्त नाही) स्थापन करावयाचा अधिकार राहील. अशा समित्यांची रचना व कार्य हे संचालक मंडळ वेळोवेळी ठरवून देईल. चेअरमन हे वरिष्ठ समितीच्या सर्व सभांचे अध्यक्ष असतील व इतर उप किंवा दुसऱ्या समित्या या सदर पोटनियमाने तयार होतील. | सात संचालक सदस्यांची एक कार्यकारी समिती संचालक स्थापन करेल. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष व मनेजिंग डायरेक्टर/मुख्य कार्यकारी अधिकारी राहतील. याशिवाय संचालक मंडळास संस्थेच्या कामकाजात सुसुत्रता आणणेकामी बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ नुसार आवश्यक तितक्या समित्या किंवा उपसमित्या स्थापन करावयाचा अधिकार राहील. अशा समित्यांची रचना व कार्य हे संचालक मंडळ वेळोवेळी ठरवून देईल. इतर उप किंवा दुसऱ्या समित्या या सदर पोटनियमाने गरजेनुसार वाढविण्यात येतील. | बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ (भारतीय राजपत्र दिनांक ३ ऑगस्ट २०२३) नुसार |
| **४३ (एच)** | नवीन | निव्वळ नफ्यापैकी १ टक्का किंवा रू.१ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल इतकी रक्कम सहकारी पुर्नवसन, पुर्नरचना आणि विकास निधी यासाठी वर्ग करणे. | बहुराज्यीय सहकारी संस्था दुरूस्ती कायदा २०२३ (भारतीय राजपत्र दिनांक ३ ऑगस्ट २०२३) नुसार |

प्रस्तावित दुरुस्ती योग्य व बरोबर असल्याने सभेने त्यास बहुमताने मंजूरी दिली. तसेच सदर पोट नियम दुरूस्तीचे प्रकरण तयार करून ते मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या कडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावे आणि याकामी आवश्यक त्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दीक्षित यांना देण्यात यावे असे ठरले.

सुचक : श्री.रविंद्र भागलराव पाटील
अनुमोदक : श्री.मोहनलाल जसराज कुमट
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र.१३ ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गैरहजर असलेल्या सभासदांची गैरहजेरी माफ करणेबाबत.

ठराव क्र.१३ मल्टि स्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ चे कलम २९/क नुसार जे सभासद सलग तीन वार्षिक सर्वसाधारण सभांना गैरहजर असतील आणि त्यांची गैरहजेरी ही सदस्यांनी वार्षिक सभेत माफ केली नसेल तर असे सभासद संस्थेचे सभासद म्हणून अपात्र ठरतात. त्यासाठी सलग तीन वार्षिक सर्वसाधारण सभांना गैरहजर असलेले सभासदांची गैरहजेरी मंजूर करणे बाबत विषय मंजूरी कामी ठेवण्यात आलेला आहे. जे सभासद सर्वसाधारण सभेत गैरहजर असतील त्यांची गैरहजेरी माफ करण्याविषयीचे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विश्राम दिक्षीत यांनी सभेला केले. त्यांस सभेतील सर्व सभासदांनी बहुमताने मंजूरी दिली. त्याप्रमाणे सभेत गैरहजर असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी माफ करण्यात यावी असे ठरले.

सुचक : श्री.अशोक मोहनलाल साखला
अनुमोदक : श्री.बाळु टिकमचंद जैन
ठराव बहुमताने मंजुर

विषय क्र १४. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठराव क्र १४. दिलेल्या मुदतीत खालीलप्रमाणे प्रश्न प्राप्त झालेले आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसमध्ये कोणाही सभासदाला माहिती हवी असल्यास त्यांनी त्याबाबत दिनांक ०६ सप्टेंबर २०२४ पूर्वी लेखी स्वरूपात कळवावे जेणेकरून सभा स्थानी माहिती देता येईल असे कळविले होते त्यास अनुसरून खालील तक्त्याप्रमाणे प्रश्न प्राप्त झाले होते. सदरचे प्रश्न व त्यास बँकेने तयार केलेले उत्तर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे वाचून दाखविले.

| अ .क्र | पत्र देणाऱ्या सभासदाचे नाव पत्राची तारीख | पत्रातील मजकुर मागणी / मागितलेली माहिती | बँकेचा खुलासा |
|---|---|---|---|
| १) | दिनांक ०३.०९.२०२४ रोजीचे बँकेचे सभासद श्री. सुधीर श्रीकृष्ण रत्नपारखी (सभासद क्र. १७५००५) यांचे पत्र | १. PMSBY/PMJJBY या योजनेखाली ज्या खातेदारांचा विमा उतरविला जातो त्यांना विमा कंपनीकडुन/ बँकेकडुन त्यांचे मोबाईलवर त्यांचे नावासह विमा रिनीवलची माहिती मिळावी. तसेच संबंधित विमा कंपनीकडुन पॉलिसीसह विमा धारकांची यादी त्या त्या शाखेत नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. विमा रिनीवल करतांना खात्यात शिल्लक असतांना देखील विमा रिनीवल केला जात नाही. | PMSBY/PMJJBY या योजनेचा लाभ बँकेच्या ग्राहक/सभासद यांना देण्यासाठी बँकेने सदर योजनेमध्ये सहभाग घेतलेला असुन बँकेचा रोल हा विमा कंपनीस प्रिमियमची रक्कम पाठविणे इतका असतो. आपला मोबाईल क्र.विमा घेतेवेळी विमा कंपनीचे फॉर्मवर नमूद असल्यास ग्राहकास बँकेने प्रिमिअमची रक्कम पाठविल्यानंतर विमा कंपनीकडुन एस.एम.एस प्राप्त होतो. ग्राहकाची विम्या संबंधित माहिती हि वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्याने ती नोटीस बोर्डवर लावता येणार नाही. मात्र अशी माहिती ग्राहकास हवी असल्यास केंद्र कार्यालय व संबंधित शाखेत उपलब्ध आहे. तसेच त्याची नोंद खात्याचे पासबुक/खातेउतारा यामध्ये मिळते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार के.वाय.सी अभावी खाते गोठविले असल्यास खात्यास रक्कम नावे पडत नाही बँकेमार्फत वेळोवेळी के.वाय.सी पुर्ततेसाठी ग्राहकांशी पाठपुरावा केला जातो. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २. फिक्स डिपॉझीट Auto Renewal System चालु केलेली आहे तसे पाहिले तर Auto Renewal न करता १४ दिवसांचे आत FDR मॅन्युअली रिनीवल करता येते. Auto Renewal हे मुदत संपल्यानंतर त्याच दिवशी Auto Renewal होते. तसे न होता दुसऱ्या दिवशी Auto Renewal केली तर मुदत संपल्यानंतर त्या दिवशी FDR मध्ये काही रक्कम वाढविणे, नाव कमी करणे/वाढविणे हे करणे सोपे जाते. | फिक्स डिपॉझीट Auto Renewal करणे अथवा न करणे हा पर्याय ग्राहकास उपलब्ध आहे व तो निवडण्याचा अधिकार ग्राहकांचा आहे. |
| | | ३. खातेधारकांच्या सेव्हिंग खात्यात फोलिओ चार्जेस ३/३ महिन्यांनी डेबिट टाकले जाते. तरी सदरचे चार्जेस रद्द करावे ही विनंती | बँकिंग क्षेत्रात ग्राहकांचे खात्यास एस.एम.एस चार्जेस, स्टेटमेंट चार्जेस इ.आकारले जातात असे चार्जेस न लावता बँक बचत खात्यावर रू.१२/— व करंट खात्यावर रू.४५— इतके चार्जेस फोलिओ चार्जेस म्हणुन दर तिमाहीस लावत आहे. इतरत्र एस.एम.एस.चार्जेस, स्टेटमेंट चार्जेस इ. आकारले जातात व ते बँक आकारणी करत असलेल्या चार्जेस पेक्षा जास्त असतात व ते दयावे लागतात. बँकेने इतर सर्व चार्जेस शून्य केलेले आहेत. नामको परिवार व नामको गोल्ड या अंतर्गत बँकेने सर्व चार्जेस फोलिओ चार्जेस सोडुन शून्य केलेले आहेत. ग्राहक हीत सर्वोतोपरी ठेऊन हा निर्णय घेतला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | दिनांक ०४.०९.२०२४ रोजीचे सभासद श्री.बोरा विजय शांतीलाल (सभासद क्र. ५१९६३) यांची ४ पत्रे | १. विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे बाबत पत्र देऊन मार्च महिन्यात दरवर्षी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याचा पायंडा पडला आहे व पत्रात नमूद केले आहे की, सर्व सभासदांनी मार्च महिन्यात होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत जास्तीत जास्त संख्येत उपस्थित रहावे. | विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याचा पायंडा पडला आहे असे नमूद केलेले विधान चूकीचे असुन एका सभासदाने दुसऱ्या सभासदास विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याची केलेली विनंती असल्याने बँक उत्तर देऊ शकत नाही.<br>बँक आपल्या निदर्शनास आणू इच्छिते की, २०२२ या वर्षी बँकेने विशेष साधारण सभा बोलावली नव्हती. तसेच विशेष सर्वसाधारण ही काही महत्वांच्या विषयांकरीता सभासदांची मंजूरी आवश्यक असते त्याकरीता बोलाविली जाते. त्याकारणाने पायंडा पडला आहे हे विधान संयुक्तिक नाही. तसेच विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस प्रसिध्द केली जाते. व त्याकरीता उपस्थित असणे हे ऐच्छिक आहे याची नोंद घ्यावी. |
| | | २. बँकेच्या ऑडीट रिपोर्टमध्ये Sub Standard Doubtful Assets या सदरामध्ये आपल्या कर्मचाऱ्याकडुन रू.६०,८९,१९,०००/— इतकी दाखविलेली आहे. उलट ऑडीटर यांनी रू. ६६,५१,८२,०००/— इतकी रक्कम वसुल व्हावी असे दिले आहे तरी सदर ऑडीट अहवालाचा लेखाजोखा व त्यात झालेल्या फरकाची सविस्तर कारणे सभेसमोर स्पष्ट करावी व मला त्याची लेखी प्रत मिळावी. | उपस्थित केलेल्या प्रश्नाचे बाबत लिखित स्वरूपातील उत्तर हे अहवालात नमूद आहे. छापलेला मजकूर यामध्ये पान क्र.९ वर सदर आकडयाचे वरील ओळीत As per Bank व As per Auditer असे नमूद आहे. म्हणजेच बँकेने केलेला एन.पी.ए व ऑडीटर यांनी प्रामाणित केलेला एन.पी.ए दर्शविला आहे. सदर माहिती ही अहवालात लिखित स्वरूपातच आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. आर्थिक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाबाबत नमूद करून त्याचे कारणे सभेपुढे स्पष्ट करणे बाबत नमूद केले आहे. तसेच मागील ३ वर्षात देखील असा खर्च वाढलेला असुन त्यास त्यांची मान्यता नसतांना सभेत प्रश्न उपस्थित करूनही इतिवृत्तात माझ्या हरकतींचा उल्लेख केलेला नाही. | चालू आर्थिक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाची माहिती स्वतंत्रपणे सोबत जोडली आहे.<br>तसेच चालू सभेमध्ये व मागील सभेमध्ये उपस्थित सभासदांनी अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाचा विषय मांडणी केल्यानंतर आपण हरकत घेऊनही उपस्थित सभासदांनी तो बहुमताने मंजूर केलेला असल्याने इतिवृत्तात तशी नोंद आहे. |
| | | ४. बँकेस रू.४८.३० लाखांचा दंड हा २०२२—२३ मध्ये झालेला आहे. ती सी.ई. ओ. यांची जबाबदारी असल्याने दंडाची रक्कम त्यांचे फंडातून/वेतनातून सदर रक्कम वसूल करावी व त्यांना बडतर्फ करावे. | बँकेस रू.४८.३० लाखांचा दंड हा मार्च २०२१ चे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अहवालातील नमूद बाबींचे संदर्भात दंड लागला आहे. सी.ई.ओ यांची नियुक्ती डिसेंबर २०२१ मध्ये झालेली आहे. अशा प्रकारचा दंड हा अनेक बँकांना झालेला आहे. त्याचे कारण मिमांसा सभेमध्ये नमूद करण्यात आली होती. सी.इ.ओ यांची नियुक्ती ही भारतीय रिझर्व्ह बँकेचे पूर्व परवानगीने होते व तसे कोणतेही कारवाईचे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेले नाहीत असे वैयक्तिक पातळीवरील कारवाईचे निर्देश देणे नियम बाहय असल्याने सदर प्रश्नांची दखल घेता येणार नाही.<br>बँकेस रू.४८.३० लाखांचा दंड हा फ्रॉड उशिरा रिपोर्ट केला बचत खातेदारांना लावलेल्या मिनिमम बॅलन्स चार्जेस यासाठी लागला आहे. फ्रॉड उशिरा रिपोर्ट करण्याचे कारण हे प्रथमत:वसूल करणे हे होते. बँकेने बेदाणा कर्जाचेबाबत झालेल्या फ्रॉड संदर्भात आजरोजी संपूर्ण वसुली केलेली आहे. तसेच २०१५ पासुन मिनिमम बॅलन्स चार्जेस आकारणी करणेबाबतचे निकष पूर्ण करणेसाठीची प्रणाली संगणक प्रणालीत उपलब्ध नसल्याने बँकेने लागलेले चार्जेस ग्राहकास परत केलेले आहेत तरीही |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बँकेस दंड झाला आहे. तसेच मिनिमम बॅलन्स चार्जेस आकारणी करणेबाबतचे निकष पुर्ण करण्यासाठीचे निकष व त्यासाठी येणारा खर्च हे बँकेस मिळणाऱ्या मिनिमम बॅलन्स चार्जेस पेक्षाही अधिक असल्याने बँकेने सदर चार्जेसची आकारणी बंद केलेली आहे. |
| ३) | दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजीचा श्री.पंडीतराव कातड पाटील यांचा अर्ज सभासद क्र. १८१९० | आपल्या बँकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सन २०२३—२४ ते २०२८—२९ या निवडणुकीसाठी किती खर्च झाला व सदर निवडणुकीत किती पॅनल होते. | सन २०२३—२४ ते २०२८—२९ या निवडणुकीसाठी एकुण रू. २,२४,२७,४२५/— इतका खर्च झाला असुन सदर निवडणुकीत २१ उमेदवारांचा १ पॅनल व सात वैयक्तिक उमेदवार होते. |
| ४) | दि.०५.०९.२०२४ रोजीचा श्री.धोंडीराम पांडुरंग बोडके (सभासद क्र. ३५७३७) यांचे पत्र | दि महाराष्ट्र अर्बन को—ऑप बँक फेडरेशनच्या वतीन सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळाल्याबद्दल दि.१४.०९.२०२४ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व संचालक मंडळाचा अभिनंदन ठराव सहमत करणेबाबत | आलेले पत्र सभासदांचे माहितीसाठी सादर. |
| ५) | श्री.प्रल्हाद सदाशिव धुमाळ सभासद क्र. ५१५३६ | १) शाखा निहाय ठेवीवरील व्याजदर<br><br>२) कर्जावरील सरासरी व्याजदर शाखानिहाय<br><br>३) बॅकेच्या एकुण शाखांपैकी तोटयात असणाऱ्या शाखा व त्यांचा तपशिल व कारणे | — शाखानिहाय ठेवींवरील व्याजदर प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत येऊन आपणास अवलोकन करता येतील.<br><br>— शाखानिहाय कर्जावरील सरासरी व्याजदर प्रशासकीय कार्यालयात कामकाजाच्या वेळेत येऊन आपणास अवलोकन करता येतील.<br><br>— बॅकेच्या एकुण ८० शाखांपैकी ३१ मार्च २०२४ अखेर १८ शाखा तोटयात असून तोटयात असणाऱ्या शाखांची माहिती प्रशासकीय कार्यालयात उपलब्ध आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४) अहवाल पान क्र.०४ वर भाग भांडवल वाढ/घट बाबत | — भागभांडवल रु.४७.६५ लाख रूपयांनी सभासद राजीनामा, सभासद मयत, निर्लेखित कर्जखाते इत्यादीमुळे भागभांडवल कमी झाले आहे. मात्र मुद्रांक दोषामुळे लिखीतमध्ये वाढ उल्लेख आहे. जो चुकीच्या दुरूस्तीत वाचण्यांत आला आहे. |
| | | ५) लॉकर भाडे व इतर उत्पन्नात घट व कारणे | — ३१ मार्च २०२३ च्या तुलनेत ३१ मार्च २०२४ मध्ये लॉकर भाडे २०.३४ लाखाने कमी दिसते. बॅकेने लॉकर भाडे आकारणी पध्दत (वसूल करणे) वर्षाच्या सुरवातीस केल्याने ३१ मार्च २०२४ ला लॉकर भाडे कमी दिसते. मात्र १ एप्रिल २०२४ ते ९ सप्टेंबर २०२४ पर्यंत (०६ महिने) ५२.९४ लाख वसूल झालेले आहेत. |
| | | ६) सेवक पगार, भत्ते यावर खर्च ३५.२७ कोटी आहे याची उत्पन्नावर टक्केवारी किती व योग्य किती | — ३१ मार्च २०२४ अखेर बॅकेचे उत्पन्न २४९.०५ कोटी असून पगार, भत्ते खर्च (३५.२७ कोटी) १४.१६ टक्के आहे मात्र खेळते भांडवल २७०३.५७ कोटी असून पगार, भत्ते यावर खर्चाचे प्रमाण १.३० टक्के आहे. आदर्श टक्केवारी खेळत्या भांडवलाच्या २.५० टक्केपेक्षा अधिक नसावी. |
| | | ७) एकुण व्यवस्थापन खर्चाचे प्रमाणे टक्केवारी किती व योग्य प्रमाण काय असावे | — व्यवस्थापन खर्च खेळते भांडवल (२७०३.५७ कोटी) च्या व्यवस्थापन खर्च (६३.८८ कोटी) २.३६ टक्के असून योग्य प्रमाण खेळत्या भांडवलाच्या ३.०० टक्के पेक्षा अधिक नसावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | श्री.तेजबहादुर कमलसिंह बुढाऐर सभासद क्र. १७७१५५ | १) बँकेने जानेवारी २०१९ ते ३१ मार्च २०२४ अखेर पर्यंत थकीत कर्ज खाते तडजोडीने बंद केले असुन त्या खात्यांची माहिति मिळावी तसेच सदर थकीत कर्ज खाते वसुलीकरीता बँकेने काय कार्यवाही केली याची सविस्तर माहिती मिळावी | या दोघांनीही विचारलेले प्रश्न हे प्रशासकीय असल्याने संबंधित विभागात जाऊन प्रत्यक्ष शहानिशा करून घ्यावी. |
| ७) | श्री.लक्ष्मण देवराम क्षिरसागर सभासद क्र. ७१३७६ | सभासदांना वाढीव शेअर्स सर्टिफिकेट वेळेत भेटत नसलेबाबत खुलासा करावा. | |

वरीलप्रमाणे आलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस वाचून दाखविली त्यावर सभासद श्री.पंडीतराव कातड पाटील यांनी नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत बँकेचा रू.२ कोटी २४ लाख २७ हजार ४२५ इतका खर्च झाला असुन त्याकरीता किती उमेदवार (पॅनल) होते असा प्रश्न पुनश्च: उपस्थित केला त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २१ उमेदवारांचे १ पॅनल व ७ वैयक्तिक उमेदवार होते असे उत्तर दिले त्यावर पंडीतराव कातड पाटील यांनी ज्या ७ उमेदवारांमुळे सदरची निवडणुक घेण्यास इतका खर्च करावा लागला त्यांचे बँकेच्या हितामध्ये काही योगदान दिसत नसल्याने केवळ चांगल्या कामांना विरोध म्हणुन सदरची निवडणुक बँकेवर लादुन भरमसाट खर्च करण्यास बँकेस भाग पाडले अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव सभेने मंजूर करावा असे म्हणताच सर्व सभासदांनी हात उंचावून श्री.पंडीतराव कातड पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नास व सुचविलेल्या प्रस्तावास हात उंचावून बहुमताने मंजूरी दिली त्यावर बँकेचे अध्यक्ष श्री.सोहनलाल भंडारी यांनी सर्व कायदेशीर बाबींचा अभ्यास करून सदरचा निर्णय घ्यावा लागेल असे सभेस सांगितले परंतु जर असे

करता येत असेल तर सदरचा ठराव मंजूर करण्यात यावा असा आग्रह सभासद श्री.पंडीतराव कातड पाटील यांनी धरला असता कायदेशीर अभ्यास करून योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार संचालक मंडळास देण्यात यावा असे बहुमताने मंजूर करण्यात आले.

येणेप्रमाणे विषय पत्रिकेनुसार सभेचे कामकाज पूर्ण झाले व उपस्थित सभासदांनी चर्चेत सहभाग नोंदविल्याबद्दल बँकेचे उपाध्यक्ष श्री.आकाश छाजेड यांनी सभासदांचे आभार मानले व सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

सुचक : श्री.पंडीतराव रंगनाथ कातड पाटील
अनुमोदक : श्री.अशोक मोहनलाल साखला
ठराव बहुमताने मंजुर

सभेच्या शेवटी सामूहिक राष्ट्रगीत झाले व त्यानंतर सर्व सभासदांकरीता बँकेचे वरिष्ठ अधिकारी श्री.मनोज घोलप यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर प्रशिक्षण दिले. येणेप्रमाणे खेळीमेळीच्या वातावरणात बँकेची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

**विश्राम दीक्षित**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सोहनलाल मोहनलाल भंडारी**
अध्यक्ष